अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

। शुक्रवार, दि. १० मे २०२४ ।



## संजय राऊतांविरोधात तक्रार दाखल




मुंबई : शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत त्यांच्या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत बोलताना संजय राऊत यांनी आक्षेपार्ह विधान केले होते. यावर भाजप नेत्यांनी आक्षेप घेत संजय राऊतांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्यांच्या अटकेचीही मागणी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत केलेल्या आक्षेपार्ह विधानावरुन संजय राऊत यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. संजय राऊत यांनी पंतप्रधान मोदींबद्दल केलेल्या वादग्रस्त विधानावरुन भाजपने आक्रमक भूमिका घेतली असून त्यांच्याविरोधात छत्रपती संभाजीनगरमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची माहिती भाजपचे प्रदेश प्रवक्ते प्रमोद राठोड यांनी दिली आहे. संजय राऊत यांच्या डोक्यावर परिणाम झाल्याचे पुन्हा दिसून आले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल संजय राऊत यांनी निंदनीय व्यक्त केले आहे. याविरोधात कुंडलिक नगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. तसेच याप्रकरणी निवडणूक आयोगाकडेही तक्रार दाखल करणार आहे. या वाचाळ व्यक्तीला लगाम घालण्याची विनंती करणार आहोत, असे भाजपचे प्रदेश प्रवक्ते प्रमोद राठोड यांनी म्हटले आहे.

### थोडक्यात



#### युसूफ पठाणच्या विजयासाठी इरफानने कसली कंबर

बहरामपूर : भारतीय क्रिकेट संघाचा माजी खेळाडू युसूफ पठाण लोकसभेच्या रिंगणात आहे. तो पश्चिम बंगालमधील बहरामपूर लोकसभा मतदारसंघातून नशीब आजमावत आहे. काँग्रेसचा गड असलेल्या या मतदारसंघात नामांकित चेहरा देऊन तृणमूल काँग्रेसने मोठी खेळी केली आहे. युसूफच्या प्रचारासाठी त्याचा भाऊ इरफान पठाण मैदानात उतरला आहे. त्याने आपल्या भावाच्या विजयासाठी रॅली काढत जनतेला मतदान करण्याचे आवाहन केले.



#### अकबरुउद्दीन ओवैसींना नवनीत राणांचं चॅलेंज

मुंबई : भाजपा नेता आणि अमरावतीमधील उमेदवार नवनीत राणा यांच्या एका वक्तव्यानं राजकारण तापलंय. एमआयएम पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवैसीचे भाऊ अकबरुद्दीन ओवैसी यांनी काही वर्षांपूर्वी एक वाग्रस्त वक्तव्य केलं होतं. १५ मिनिटांसाठी पोलीस बाजूला केले तर आम्ही तुम्हाला सांगू असं ओवैसी यांनी म्हटलं होतं. ओवैसीच्या त्या वक्तव्यावर नवनीत राणा यांनी उत्तर दिलंय. नवनीत राणा यांनी हैदराबादमधील एका प्रचार सभेत बोलताना अकबरुद्दीन ओवैसींच्या १५ मिनिटांच्या वक्तव्यावर १५ सेकंदांचं चॅलेंज दिलं. १५ सेकंद पोलीस हटवले तर ते कुठून आले आणि कुठून गेले हे त्यांना समजणार नाही, असं राणा यांनी म्हंटलंय.

#### मोदी-राज एकाच व्यासपीठावर येणार

मुंबई : प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकाच व्यासपीठावर येणार आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात पहिल्यांदाच या दोन नेत्यांची तोफ एकत्र धडधडणार आहे. येत्या १७ मे रोजी महायुतीची जाहीर सभा छत्रपती शिवाजी पार्क मैदानात होणार आहे. या ऐतिहासिक सभेचा टीझर लॉन्च करण्यात आला आहे.

#### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या निवडणुकीच्या धांदलीत आमरसाचा विसर पडला होता !

कल्याण
359-79-180

मुंबई
189-86-268

# खून करून आरक्षणासाठी आत्महत्येचा बनाव उघड

## पोस्टमार्टेमुळे कळले वडिलांनीच गळा दाबून मुलाला संपवले अन् पंख्याला लटकवले

जालना/प्रतिनिधी

काही महिन्यांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषण सुरु केले होते. जरांगे पाटलांच्या या आंदोलनानंतर मराठा आरक्षण आंदोलनाचे लोण राज्यभरात पसरले होते. या काळात विशेषत: मराठवाड्यातील मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी प्रचंड आक्रमक झाला होता. हे आंदोलन दीर्घकाळ सुरु होते. यादरम्यान काही मराठा तरुणांनी सरकार आरक्षणाची मागणी मान्य करत नसल्याने नैराश्याच्या भरात आत्महत्या केली होती. हा मुद्दा तेव्हा चांगलाच गाजला होता. राज्य सरकारने त्यावेळी आत्महत्या केलेल्या मराठा तरुणांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करुन हा रोष शमविण्याचा प्रयत्न केला होता.



महादेव थुटे





या पार्श्वभूमीवर एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. जालन्यात एका मराठा तरुणाच्या आत्महत्येचा बनाव रचण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. वडिलांनीच मुलाची हत्या करुन नंतर त्याने मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केल्याची खोटी कहाणी रचल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात हा प्रकार घडला. येथील मुरुम या गावातील १९ वर्षांच्या महादेव थुटे या तरुणाने काही दिवसांपूर्वी आत्महत्या केल्याची माहिती समोर आली होती. परंतु, आता याप्रकरणाला वेगळेच वळण मिळाले आहे. महादे थुटे याने आत्महत्या केली नसून त्याची हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

> **हत्येचं गुढ कसं उकललं?**
>
> सुरुवातीला सर्वांनाच महादेव याने मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केल्याचे वाटले. पण डॉक्टरांकडून शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर पोलिसांना वेगळाच संशय आला. त्यामुळे पोलिसांनी महादेव थुटे याचा मृतदेह व्हिसेरा तपासणीसाठी पाठवला. त्यामध्ये महादेवचा गळा दाबून मृत्यू झाल्याची बाब समोर आली. यानंतर पोलिसांनी शिवप्रसाद थुटे यांना चौकशीसाठी बोलावले. चौकशीवेळी पोलिसी खाक्या दाखवताच शिवप्रसाद थुटे यांनी आपणच मुलाची हत्या केल्याचे कबुल केले.

महादेव थुटे याच्या वडिलांनीच त्याची हत्या केली. पोलिसांनी याप्रकरणी महादेवच्या वडिलांना अटक केली आहे. शिवप्रसाद थुटे यांचा त्यांचा मुलगा महादेव याच्यासोबत वाद झाला. याच वादावेळी शिवप्रसाद थुटे यांनी रागाच्या भरात आपल्या मुलाचा गळा दाबून त्याची हत्या केली. त्यानंतर मुलाचा मृतदेह पंख्याला लटकवून त्याने आत्महत्येचा बनाव रचला. याशिवाय, आपण मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करत असल्याचे एक चिठ्ठीदेखील महादेवच्या मृतदेहाच्या बाजूला ठेवून दिली. त्यामुळे महादेवने आत्महत्या केली, असा सर्वांचा समज झाला.

# हरियाणात भाजप समर्थक १० आमदार काँग्रेसच्या संपर्कात?

नवी दिल्ली

हरियाणात नुकत्याच झालेल्या राजकीय उलथापालथीमुळे भाजपा अडचणीत आला आहे. हरियाणात भाजपाला पाठिंबा देणार्या तीन आमदारांनी आपला पाठिंबा काढून घेत, तिन्ही आमदार काँग्रेसच्या गोटात गेले आहेत. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसमधील विधिमंडळ पक्षनेता भूपिंदर सिंह हुड्डाच याचे सुत्रधार असल्याचे सांगण्यात येत आहे. सूत्रांनी सांगितले की, त्यांनी वैयक्तिक भेट घेत, चार अपक्ष आमदारांना भाजपा सरकारचा पाठिंबा काढून घेण्यास आणि काँग्रेसला पाठिंबा देण्यास सांगितले. परंतु, हुड्डा यांच्या नेतृत्वाखालील रोहतक पत्रकार परिषदेत फक्त तीन आमदार सहभागी झाले आणि घोषणा केली की, त्यांनी आपली बाजू बदलली आहे. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भूपिंदर सिंह हुड्डा यांना भाजपाच्या पाठिंबा दिल्याने, सैनी सरकारचे संख्याबळ ४३ आहे. तसेच भाजपाने आणखी चार जननायक जनता पक्ष (जेजेपी) आमदारांचे समर्थन असल्याचा दावा केला आहे.



> **अपक्ष आमदारांच्या पाठिंब्यामुळे काँग्रेस मजबूत**
>
> काँग्रेस समर्थकांनी असेही निदर्शनास आणून दिले की, काँग्रेसचे सभागृहात ३० आमदार आहेत. अपक्ष आमदारांचा पाठिंबा मिळाल्यामुळे त्यांच्या जातीय मतदारांचा पाठींबाही पक्षाला मिळेल. सांगवान हे जाट आहेत, तर धरमपाल गोंडर हे अनुसूचित जातीचे आहेत आणि रणधीर गोलेन हे रोर समाजाचे आहेत.

सूत्रांनी सांगितले की, ही उलथापालथ इथपर्यंतच मर्यादित नव्हती. हुड्डा अजूनही इतर अपक्ष आमदार आणि जेजेपीच्या १० आमदारांच्या संपर्कात आहेत. या आमदारांची दुष्यंत चौटाला यांच्याशी असणारी निष्ठा संशयास्पद आहे. आता काँग्रेसबरोबर असलेल्या अपक्ष आमदारांपैकी सोंबीर सांगवान यांनी 'द इंडियन एक्स्प्रेसला' सांगितले, ४ जूनपर्यंत थांबा. लोकसभा निवडणुकींचे निकाल लागताच भाजपाचे अनेक आमदारही पक्ष बदलण्यास तयार होतील. सैनी सरकार टिकले तरी विधानसभा निवडणुकांना पाच महिन्यांहून कमी कालावधी शिल्लक आहे आणि हुड्डा यांनी राज्यात वातावरणनिर्मिती सुरू केली आहे, असे एका नेत्याने सांगितले.

जेजेपी नेते दुष्यंत चौटाला यांनी बुधवारी विधान केले होते की, हुड्डा यांनी राज्य सरकार पाडण्याच्या हालचाली सुरू केल्यास ते काँग्रेसला पाठिंबा देण्यास तयार आहेत. या विधानावर हुड्डा म्हणाले होते की, जेजेपी ही भाजपाची बी टिम आहे. त्यांना सरकार पाडण्याची इच्छा असेल तर, त्यांनी आपल्या आमदारांना राज्यपालांसमोर आणावे. हुड्डाच्या समर्थकांनी सांगितले की, हुड्डा यांना भीती आहे की विरोधकांची मते विभागण्यासाठी हा चौटाला यांचा गेम प्लॅन आहे.

## दोन दिवसाच गटारीतून काढला ५२ टन कचरा

सांगली : मान्सूनपूर्व नालेसफाईच्या मोहिमेत सांगलीतील शंभर फुटी भोबे गटारीतून दोन दिवसात तब्बल ५२ टन प्लास्टिक मिश्रित कचरा काढण्यात आला. या गटारीची स्वच्छता मोहिम अंतिम टप्प्यात आली असल्याचे महापालिकेच्यावतीने गुरूवारी सांगण्यात आले.

पावसाळी पूर्व नाले सफाई ,स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. आयुक्त तथा प्रशासक शुभम गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुकत वैभव साबळे, आरोग्याधिकारी डॉ. रविंद्र ताटे यांच्या पथकाकडून ही मोहिम राबविण्यात येत असून शहरातील शंभर फुटी रोडवरील भोबे मोठी गटार स्वच्छतेची मोहीम कालपासून हाती घेण्यात आली. अवघ्या दोन दिवसात या गटारीतून प्लास्टिक व अन्य असा ५२ टन कचरा काढण्यात आला.

### मुस्लीम समाजाबद्दल अपशब्द

## रवि गायकवाड यांच्या विरोधात फिर्याद

परंडा/प्रतिनिधी

माजी खासदार रविंद्र गायकवाड यांनी मुस्लीम समाजाबद्दल अपशब्द वापरुन धार्मिक भावना दुखावल्याने गुन्हा दाखल करावा अशी मागणी परंडा शहरातील मुस्लीम समाजाच्या वतीने दि ९ रोजी करण्यात आली आहे. त्यांच्यावर रात्री उशरा फिर्याद दाखल करण्यात आली



सामाजिक कार्यकर्ते इरफान शेख यांनी रवि गायकवाड यांच्या विरूद्ध फिर्याद दाखल गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. मुस्लीम समाजाच्या वतीने तहसिलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की दि. ०५ मे रोजी सायंकाळी शिवाजी चौक, उमरगा येथे लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचार सभेत माजी खासदार रविंद्र गायकवाड, याने जिल्हयात अत्यंत शांतपणे चाललेल्या लोकसभेच्या प्रचारादरम्यान जाणुनबुजुन शांतता भंग करण्याच्या हेतुने समाजा-समाजामध्ये जातीय तेढ निर्माण व्हावे या हेतुने भरसभेत मुस्लीम समाज व मौलवी यांच्याबद्दल खालच्या दर्जात अपशब्द वापरुन जिल्हयातील व समस्त मुस्लीम समाजाच्या धार्मिक भावना दुखविल्या आहेत त्यांचा वर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.ठाण्यात फिर्याद दाखल करून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

## शिकाऊ वाहन परवाना प्रक्रियेत आरटीओकडून बदल

पुणे/प्रतिनिधी

एखाद्या व्यक्तीकडे दुचाकी चालविण्याचा पक्का परवाना असेल, तर त्याला मोटार चालविण्याचा शिकाऊ परवाना विनाचाचणी ऑनलाइन मिळतो. त्यासाठी त्याला प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) जाण्याची आवश्यकता नसते. मात्र, मागील काही महिन्यांपासून ऑनलाइन यंत्रणेतील तांत्रिक अडचणीमुळे अर्जदारांना आरटीओत हेलपाटे मारावे लागत होते. यावर अखेर तोडगा निघाल्याने अर्जदारांना शिकाऊ परवाना ऑनलाइन मिळण्यास सुरुवात झाली आहे.





आरटीओच्या अनेक सेवा ऑनलाइन आहेत. या सेवेत वारंवार तांत्रिक अडचणी आल्याने नागरिकांना कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. अशा नागरिकांची लूट मध्यस्थ करतात. आरटीओत मध्यस्थांकडून सुरू असलेली लूट आणि गैरप्रकारांबाबतचे वृत्त लोकसत्ताने दिले होते. त्यानंतर याबाबत पावले उचलण्यात आली आहेत. नागरिकांना ऑनलाइन सेवा मिळाव्यात आणि त्यांना हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी आरटीओकडून कार्यवाही सुरू झाली आहे.

एखाद्या व्यक्तीकडे दुचाकी चालविण्याचा पक्का परवाना असेल, तर त्याला इतर वाहनाचा शिकाऊ परवाना ऑनलाइन मिळतो. त्यासाठी त्याला चाचणी देण्याची आवश्यकता नाही. ही ऑनलाइन सेवा २०२१ पासून सुरू असूनही नागरिकांना ती उपलब्ध झालेली नव्हती. याबाबत राष्ट्रीय सूचना केंद्रात बुधवारी बैठक झाली. त्यात या सेवेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यात आल्या.



## मतटक्का वाढविण्यासाठी गृहनिर्माण सोसायट्यांची मदत

पुणे : पुणे, मुंबई आणि ठाणे या महानगरांमधील मतदानाची टक्केवारी कमी असते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून मतदान जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात आले. पुणे, मुंबई आणि ठाणे परिसरातील लोकसभा मतदार संघांमध्ये अनुक्रमे १३ मे आणि २० मे रोजी मतदान होणार आहे. या दोन्ही दिवशी सोमवार असल्याने शनिवार, रविवार लागून सुट्या असल्याने मतदानाचा टक्का घसण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर पुणे, मुंबई आणि ठाण्यातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांना मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे अधिकार देण्यात आले असून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी या पदाधिकाऱ्यांची मदत घेतली जात आहे.

गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटचे प्रमाण जास्त असून तेथील मतदारांची संख्या अधिक आहे. लोकसभा निवडणुकीत अधिकाधिक मतदान होण्यासाठी ३५ गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. मतदारांना मतदान केंद्राची माहिती होण्यासाठी तयार करण्यात आलेला क्यूआर कोड संस्थेच्या दर्शनी भागात लावण्यात येणार आहे.

## आडातच भरणारा 'रहिमतपूर पॅटर्न'



सोलापूर/प्रतिनिधी

आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार, अशी म्हण आहे. मात्र, एका विशेष उपक्रमामुळे आडातील पाणी थेट पोहऱ्यात येणार आहे. दुष्काळाचा सामना करीत असलेल्या रहिमतपूर (जि. सातारा) परिसरातील दहा गावांमधील विहिरी आणि आडांच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. गावातील विद्यार्थी उन्हाळी सुटीत सर्वेक्षण करणार असून, त्यानंतर सर्वंकष आराखडा तयार करून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला जाणार आहे.

> **असे होणार जलस्रोतांचे पुनरुज्जीवन**
>
> सर्वेक्षणाचा विस्तृत अहवाल एक समिती तयार करेल. त्यातून १० गावांमध्ये विहीर, आड आणि बोअरवेल यांची स्थिती काय आहे हे स्पष्ट होईल. त्या आधारे पुढे काय करायचे याचा कृती आराखडा बनवला जाईल. विहिरी जिवंत कशा ठेवायच्या, त्या वापरात कशा राहतील, घराघरांवरील पावसाचे पाणी त्यात कसे सोडता येईल, ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद यांची काय आणि कशी मदत घेता येईल, लोकसहभागाद्वारे भूजल पुनर्भरण कसे करता येईल याबाबतची रूपरेषा निश्चित केली जाणार आहे.

रहिमतपूरचे भूमिपूत्र आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे यांच्या संकल्पनेतून विहिरी, आड आणि कूपनलिकांचे (बोअरवेल) सर्वेक्षण केले जाणार आहे. डॉ. शेंडे यांची ग्रीन तेर फाउंडेशन आणि श्री चौंडेश्वरी एज्युकेशन सोसायटी यांच्या पुढाकारातून सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे.

गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस न झाल्याने राज्याच्या अनेक भागांत तीव्र पाणी टंचाई आहे. सातारा जिल्ह्यातही अशीच स्थिती आहे. विहीर आणि आड हे पाण्याचे जिवंत, नैसर्गिक स्रोत आहेत. त्यांचे पुनरुज्जीवन झाल्यास त्याचा लाभ ग्रामस्थांना, शेतीला, तसेच भूजल पातळी वाढवण्यात होणार आहे. या उद्देशाने संस्थेच्या तीन शाळांमधील नववी आणि दहावीच्या १५० विद्यार्थ्यांची सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. एक मे रोजी शैक्षणिक निकालाच्या दिवशी १० गावांतील विद्यार्थ्यांना सर्वेक्षणासाठी प्रश्नावली देण्यात आली.

